केंद्र शासन पुरस्कृत “राष्ट्रीय नागरी उपजीविका” अभियान (National Urban Livelihoods Mission ) व राज्य शासन पुरस्कृत, “राज्य नागरी उपजीविका अभियानाची” (State Urban Livelihoods Mission) राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २८ ऑगस्ट, २०१४

वाचा §

१) केंद्र शासनाचे राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या मार्गदर्शक सूचना, क्र. K- १४०११ /१/२०१३-UPA, दि. २४/०९/२०१३
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. DO No. K-१४०११/१/२०१३- UPA dated २०/१२/२०१३
३) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. सुजयो १०९७/प्र.क्र.१४६/९७/नवि-३३ दि. २० डिसेंबर १९९७
४) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. सुजयो १०९७/प्र.क्र.१४२/९७/नवि-३३ दि.२० मार्च,१९९८
५) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. सुजयो २००१/६९०/प्र.क्र.२८/नवि-३३ दि. १० मे, २००२
६) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. संकिर्ण-२०१०/प्र.क्र.४५/नवि-२०, दि. १४ जुलै, २०११
७) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. राजेधो २०१३/प्र.क्र.३९/नवि-३४, दि. २९, ऑक्टोबर, २०१३

प्रस्तावना §

केंद्र शासन पुरस्कृत “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना” देशात १९९७ सालापासून कार्यान्वित आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत सदरहू “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेची” पुनर्रचना करून त्याचे “राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान” (National Urban Livelihoods Mission) मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय दिनांक ०३/०९/२०१३ रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आर्थिक

Scanned with OKEN Scanner

व्यवहार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाद्वारे", शहरी दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे, शहरी गरीब कुटुंबातील व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराची किंवा स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे, नागरी बेघरांना मूलभूत सेवा उपलब्ध असलेल्या निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करणे, नागरी भागातील फेरीवाल्यांच्या उपजिविका संबंधी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे, व त्याद्वारे शहरी गरीब कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारून शहरी दारिद्रय कमी करण्याबाबत उपाययोजना केली जाईल.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची" अंमलबजावणी सन २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात व १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या परंतु जिल्हा मुख्यालय असलेल्या शहरात केली जाणार आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने अभियानाच्या अंमलबजावणीकरीता परिशिष्ट "अ" येथे दर्शविलेल्या राज्यातील एकूण ५३ शहरांची निवड केली आहे.

राज्यातील उर्वरीत २०६ शहरांचा "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना" अंतर्गत समावेश करण्यात आला नसल्यामुळे या शहरातील दारिद्रय रेषेखालील नागरीकांचे राहणीमान उंचावण्याकरीता व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याकरीता राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या धर्तीवर राज्य शासन पुरस्कृत स्वतंत्र "राज्य नागरी उपजिविका अभियान" राबविण्याचे आवश्यक झाले आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्याच्या नागरी क्षेत्रांसाठी "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने" ऐवजी ५३ शहरांमध्ये "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" व उर्वरीत २०६ शहरांमध्ये राज्य शासन पुरस्कृत "राज्य नागरी उपजिविका अभियान" राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने विभागाच्या प्रस्तावावर नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय विचारात घेता दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार अभियानाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

## शासन निर्णय -

२. केंद्र शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासन पुरस्कृत "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना" दि. १/०४/२०१४ पासून संपुष्टात आली असून त्या ऐवजी परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्यानुसार



Scanned with OKEN Scanner

राज्यातील एकूण ५३ शहरांमध्ये खालील परिच्छेद ३ येथे नमूद भाग "१" मध्ये विषद केल्यानुसार "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची" अंमलबजावणी केली जाईल.

राज्यातील उर्वरीत २०६ शहरातील दारिद्रय रेषेखालील नागरीकांचे राहणीमान उंचावण्याकरीता व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याकरीता राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या धर्तीवर राज्य शासन पुरस्कृत "राज्य नागरी उपजिविका अभियान" परिच्छेद ४ येथे नमूद भाग २ मध्ये विषद केल्यानुसार अंमलबजावणी केली जाईल.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार "सामाजिक आर्थिक जातनिहाय जनगणनेच्या" आधारे (Socio Economic Caste Census) निश्चित करण्यात आलेल्या शहरी गरीब लाभार्थींचा या योजने अंतर्गत समावेश केला जाणार आहे. तथापि सामाजिक आर्थिक जनगणनेची आकडेवारी निश्चित होईपर्यंत राज्य शासनाने निश्चित केलेल्या दारिद्रय रेषेखालील यादीतील कुंटुंबे या दोन्ही अभियानाचे लाभार्थी असतील.

त्या अनुषंगाने "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान"व "राज्य नागरी उपजिविका अभियानाची" अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

## भाग-१

## ०३. "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान:-

### ३.१ अभियानाची उद्दिष्टये :

- नागरी गरीब लोक, त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्रय निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे,
- नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींना उपजिविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे,
- बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार, विविध क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेऊन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
- नागरी गरिबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.
- नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मूलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे.
- नागरी फेरीवाल्यांच्या उपजिविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.



Scanned with OKEN Scanner

## ३.२ अभियानाचा वित्तीय आकृतीबंध:-

अभियानाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र व राज्य शासनामार्फत **७५:२५** या वित्तीय आकृतीबंधानुसार अनुदान उपलब्ध केले जाईल.

## ३.३ अभियानाची उपांगे :-

- सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी. (Social Mobilization and Institutional Development)
- कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता. (Employment Through Skill Training & Placement)
- क्षमता बांधणी व प्रशिक्षण. (Capacity Building and Training)
- स्वयंरोजगार कार्यक्रम. (Self Employment Programme)
- फेरीवाल्यांना सहाय्य. (Support to Urban Street Vendors)
- शहरी बेघरांसाठी निवारा. (Scheme of Shelter for Urban Homeless)

## ३.३.१ उपांग ०१ :-

**<u>सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी :</u>**

अभियानाच्या अंमलबजावणी अंतर्गत उपलब्ध असलेल्या लाभार्थ्यांचा सामाजिक सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने या उपांगाची अंमलबजावणी करण्यात येईल. “स्वयंसहाय्य समुह” व त्यांच्या संघांचे प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमतावृद्धी करण्यावर या उपांगाद्वारे भर देण्यात येईल. त्या अनुषंगाने, त्यांचे जीवनमान सुधारणे, पतव्यवस्थेचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापकीय व कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यात येईल. या उपांगाची अंमलबजावणी खालील त्रिस्तरीय संरचनेनुसार केली जाईल:-

### अ) प्रथम स्तर :- स्वयं सहाय गट (Self Help Group) –

शहरी गरीबांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने १० ते २० महिला किंवा पुरूष एकत्र येऊन सदर गट स्थापन करतील. सदर गट, बँकेकडून कर्ज व बचतीच्या माध्यमातून एकत्रित निधी उभा करून गटांच्या सदस्यांना गरजेनुसार अल्प मुदतीची कर्जे उपलब्ध करतील. सदरहू गट नोंदणीकृत असणे आवश्यक राहणार नाही. अभियानांतर्गत सर्वसाधारणत: प्रथम, महिला सभासदांचे स्वयंसहाय



Scanned with OKEN Scanner

गट स्थापन करणे आवश्यक राहिल. तथापि आवश्यकतेनुसार विकलांग पुरूषांचे गट देखील स्थापन करता येतील. हे समूह नागरी गरीबांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक गरजांची पूर्तता करण्यासाठी काम करतील. "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत" स्थापित महिला स्वयंसहाय्य गट किंवा समूहांचा यात समावेश केला जाईल. "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत", या निवडक ५३ शहरांमध्ये स्थापित असलेल्या गटांचा आढावा घेवून आवश्यक असलेल्या उर्वरीत कुटुंबाना स्वयंसहाय्य गटामध्ये समावेश करून घेण्याचा कालबद्ध कार्यक्रम, "राज्य अभियान संचालक" यांच्या मार्फत ठरविण्यात येईल. सदरहू गटाच्या दैनंदिन कामकाजाकरिता अभियानातंर्गत प्रति गट रू. १०,०००/- प्रमाणे फिरता निधी राज्य अभियान संचालकांमार्फत उपलब्ध करून दिला जाईल. याकरिता केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत नियुक्त केलेल्या विविध यंत्रणेमार्फत (अंगणवाडी सेविका, आशा इत्यादी मार्फत) सदर गटांची स्थापना करता येईल. सदरहु गटांची स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणाच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट सूचना राज्य अभियान संचालकांनी निर्गमित कराव्यात.

**ब) द्वितीय स्तर :- वस्ती स्तर संघ** (Area Level Federation) -

प्रभागातील अथवा वॉर्ड स्तरावरील स्थापीत सर्व स्वयंसहाय्य समूह संघ एकत्र येऊन त्यांचे "वस्ती स्तर संघ" स्थापीत केले जाईल. १० ते २० स्वयंसहाय्य गटांचे मिळून एक "वस्ती स्तर संघ" स्थापीत होईल. सदर वस्ती स्तर संघ प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत असणे आवश्यक राहिल. "स्वयं सहाय्य गटास" बॅकेत खाते उघडणे, कर्ज उपलब्धतेसाठी मार्गदर्शन करणे, गटांची क्षमता बांधणी करणे, विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सहाय्य मिळविण्यासाठी मार्गदर्शन करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची प्रमुख जबाबदारी "वस्ती स्तर संघाची" राहील. उपांगाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता "वस्ती स्तर संघाच्या" अभियानातंर्गत विकासासाठी रूपये ५०,०००/- इतका वार्षिक निधी राज्य अभियान संचालकामार्फत उपलब्ध करून दिला जाईल. "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने" अंतर्गत या निवडक ५३ शहरांमध्ये सध्या स्थापीत असलेले सर्व "शेजार समूह समिती" (Neighbourhood Committee) या वस्ती स्तर संघामध्ये रुपांतरीत होतील. अभियाना अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणाच्या अधीन राहून या बाबतच्या विस्तृत सूचना राज्य अभियान संचालक यांच्या मार्फत निर्गमित केल्या जातील.



Scanned with OKEN Scanner

**क) तृतीय स्तर :- शहर स्तरावरील समूह** (City Level Federation) –

अभियाना अंतर्गत समावेश असलेल्या शहर स्तरावरील सर्व "वस्ती स्तर संघ" एकत्रित येऊन "शहर स्तरावरील समूह" स्थापन केले जाईल. प्रत्येक शहरात किमान एक शहर स्तरावरील समूह असणे आवश्यक राहील, सदर शहर स्तरावरील समूह प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत राहील.

शहरातील प्रत्येक "वस्ती स्तर संघाचे" प्रतिनिधित्व "शहर स्तरावरील समूहामध्ये" असणे अनिर्वाय राहिल. शहरातील विविध स्वयं सहाय्य गट, संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, शहरातील वित्तीय संस्था इत्यादींशी समन्वय साधणे, शहरातील फेरीवाले यांचे नियोजन व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कार्यवाही करून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याची जबाबदारी सदरहु शहर स्तरावरील समूहाची राहील. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत या ५३ शहरांमध्ये स्थापित असलेल्या "समाज विकास संस्था" (Community Development Society) या "शहर स्तरावरील समूहा"मध्ये रुपांतरीत होतील.

- क्षेत्रीय स्तरावर स्वयंसहाय्य समूहांची स्थापना, क्षमता बांधणी, बँक लिंकेज, समूहांना उद्योग उभारण्यासाठी मदत व मार्गदर्शन इत्यादीं साठी एक वा अधिक "संसाधन संस्था" (Resource Organization) ची नेमणूक करण्यात येईल. सदर "संसाधन संस्थेने", दोन वर्षांपर्यंत केलेल्या कामाचा मोबदला म्हणून त्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, प्रति स्वयंसहाय गटाकरिता जास्तीत जास्त रुपये १०,०००/- पर्यंत मानधन देय राहिल. केंद्र शासन/ राज्य शासनाने स्थापन केलेल्या नोंदणीकृत संस्था, दीर्घकाळापासून स्थापित व प्रस्थापित स्वयंसहाय गट अथवा योग्य स्वयंसेवी संस्थेची, "संसाधन संस्था" म्हणून नियुक्ती करता येईल. केंद्र शासनाच्या धोरणानुसार व मार्गदर्शक सूचनेच्या अधीन राहून संसाधन संस्थेच्या नियुक्तीच्या सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

- **<u>सर्वसमावेशक वित्तीय समावेशन</u>** <u>(Universal Financial inclusion):-</u>

या उपघटकाअंतर्गत, सर्व शहरी गरीबांना बँकींग सेवा उपलब्ध करून देणे, विमा योजनेचा लाभ देऊन सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यावर भर दिला जाईल. त्या अनुषंगाने स्वयंसहाय्य समूहांना व संघांना बँकिंग सेवा उपलब्ध करणे, बँकेत बचत खाते उघडण्यापूरती बँकिंग सेवा सिमित न ठेवता वैश्वीक आर्थिक अंतर्भाव साध्य करणे, लाभार्थ्यांची आर्थिक गरज व पतपूरवठा बँक प्रणालीतून प्राप्तीसाठी अभियानाअंतर्गत तरतूद केली जाईल. तसेच जिवनरक्षा, आरोग्य आणि साधनसंपत्ती या गरजांना राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना, जनश्री विमा योजना या सारख्या योजनांशी सांगड घालून संरक्षण देण्याबाबत उपाययोजना केल्या जातील.



Scanned with OKEN Scanner

- <u>शहरी उपजीविका केंद्र (City Livelihood Center)-</u>

सदर अभियानाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सेवा व उत्पादीत मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी अभियाना अंतर्गत शहरी उपजिविका केंद्राची उभारणी करण्यात येईल. १ ते ३ लक्ष लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी एक केंद्र, ३ लक्ष पेक्षा जास्त परंतु ५ लक्ष पर्यत लोकसंख्येच्या शहरांसाठी दोन केंद्र, ५ लक्ष पेक्षा जास्त परंतू १० लक्ष लोकसंख्ये पर्यंतच्या शहरांसाठी तीन केंद्रे, व १० लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्येच्या शहरांसाठी आठ केंद्रांची स्थापना करण्यात येईल. १ लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या परंतु जिल्हा मुख्यालय ठिकाण असलेल्या शहरांमध्ये एक “शहरी उपजीविका केंद्र” स्थापन करण्यात येईल. “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत” परिशिष्ट “अ” येथे निवडक ५३ शहरांमध्ये स्थापीत असलेल्या “आधार केंद्राची” सांगड “शहरी उपजीविका केंद्रा”बरोबर घातली जाईल. अभियाना अंतर्गत “स्वयंसहाय्य समुह” व त्यांच्या संघांचे प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमतावृद्धी करण्यावर या उपघटकाद्वारे भर दिला जाईल. अभियानाच्या अंमलबजावणी करीता प्रत्येक शहर उपजीविका केंद्रास रूपये १० लक्ष इतका अनावर्ती निधी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, तीन हफ्त्यांमध्ये संचालक राज्य अभियान यांच्या मार्फत उपलब्ध केला जाईल. कोणत्याही परिस्थितीत, बांधकाम अथवा दुरूस्तीकरीता सदरहु निधी वापरला जाणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घेणे आवश्यक राहील. केंद्र शासनाच्या धोरण व मार्गदर्शक सूचनेच्या आधारे “शहर उपजीविका केंद्राची” स्थापना व कार्यप्रणाली बाबतच्या सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

## ३.३.२ उपांग-२:-

**“क्षमता बांधणी व प्रशिक्षण”** (Capacity Building & Training) :

नागरी दारीद्रय निमुर्लन कार्यक्रमात उच्च दर्जाच्या व्यावसायिक (Professional) सेवांचा अंतर्भाव करून सदर कार्यक्रम अधिक प्रभावी व तांत्रिकदृष्टया सक्षमरीतीने राबविण्याच्या दृष्टीने या उपांगांतर्गत, “राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष” व “शहर अभियान व्यवस्थापन कक्षा”साठी, व्यावसायिक तज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

अ) राज्यस्तर:-

"राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष (State Mission Management Unit) - राज्यात राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची अंमलबजावणी, संनियंत्रण, समन्वय व त्या अनुषंगाने दैनंदिन कामकाजाची जबाबदारी पार पाडण्यासाठी, नगरपरिषद प्रशासन संचालनालय येथे राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना "राज्य अभियान संचालक" म्हणून या शासन निर्णयाद्वारे नामनिर्देशित करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेच्या व धोरणांच्या आधारे सविस्तर सुचना निर्गमित करणे, परिशिष्ट "अ" येथील अभियान शहरांना या अभियानाची माहिती पूरविणे, संबंधितांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे, राज्य व केंद्र शासनाला आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करणे, अभियानाच्या उद्दिष्ट पुर्तीसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे, केंद्र व राज्य शासनामार्फत प्राप्त निधीचा योग्य विनियोग होत असल्याची दक्षता घेणे, निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र व राज्य शासनास तसेच महालेखापाल कार्यालयास सादर करणे, अभियानाअंतर्गत मंजूर कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांची व तज्ञांची नियुक्ती करणे इत्यादी बाबतीत आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्य अभियान संचालक यांची राहिल.

- **शासकिय संवर्गातील पदे:-**

"राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या" उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता परिशिष्ट "ब" येथे नमूद केल्यानुसार "राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाची" स्थापना नगरपरिषद प्रशासन संचालनालयात करण्याबाबत राज्य अभियान संचालकांनी आवश्यक कार्यवाही करावी. सदरहू राज्यस्तरीय कक्षाची प्रचलित नियमानुसार नोंदणीकृत संस्था म्हणून राज्य अभियान संचालक यांचेमार्फत नोंदणी केली जाईल. राज्य अभियान व्यवस्थापन कक्षात परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविल्यानुसार प्रशासकिय संरचनेस मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या वर्ग १,२,३ व ४ मधील विविध संवर्गातील एकूण १० पदे अभियान कालावधीपूरती निर्माण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

- **कंत्राटी तत्वावरील पदे**

अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणी करीता खालीलप्रमाणे विविध क्षेत्रातील तज्ञांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर खाली दर्शविल्यानुसार केली जाईल.



Scanned with OKEN Scanner

१) राज्य अभियान व्यवस्थापक - सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी (State Mission Manager - Social Mobilization and Institutional Development.)
२) राज्य अभियान व्यवस्थापक - निवारा व सामाजिक संरचना (State Mission Manager - Shelter and Social Infrastructure)
३) राज्य अभियान व्यवस्थापक - कौशल्य व उपजीविका (State Mission Manager - Skills and livelihoods)
४) राज्य अभियान व्यवस्थापक - वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय (State Mission Manager - Financial Inclusion and Micro Enterprises)
५) राज्य अभियान व्यवस्थापक - माहिती संनियंत्रण प्रणाली व मुल्यांकन संनियंत्रण (State Mission Manager - MIS and Monitoring and Evaluation)
६) राज्य अभियान व्यवस्थापक - मानव संसाधन व क्षमता बांधणी (State Mission Manager - Human Resource and Capacity Building)

वरील तज्ञांची नियुक्ती प्रथमत: दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर, ठोक मासिक मानधन कमाल रू. ६०,०००/- वर केली जाईल. सरदहू कालावधीत कामाचे मूल्यमापन समाधानकारक असल्यास संबंधित तांत्रिक तज्ञ कंत्राट नूतनीकरण करण्यास पात्र ठरतील. कंत्राटी तत्वावरील नियुक्ती करण्याकरीता राज्य अभियान संचालक यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य छाननी व निवड समिती" गठीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार व विहीत कार्यपद्धतीनुसार संबंधित तज्ञांची नियुक्ती या समितीमार्फत केली जाईल. सदर समितीमार्फत कंत्राटी तत्वावरील तज्ञांचे कंत्राट नुतनीकरण करण्याबाबतची कार्यवाही देखील केली जाईल. राज्य छाननी व निवड समिती बाबतचे विस्तृत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील.

सदर पदावर नियुक्त तज्ञ व्यक्ती, राज्य अभियान संचालक यांच्या नियंत्रणाखाली व त्यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार काम करतील. कंत्राटी तत्वावरील नियुक्तीसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व अभियानाअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणानुसार, तसेच कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत वेळोवेळी राज्यशासनाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या अधीन राहून कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याच्या कार्यपद्धतीबाबत, राज्य अभियान संचालकांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत. कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांची सेवा ही कंत्राटी तत्वावरच राहिल व शासकिय सेवकांना अनुज्ञेय असलेले कोणतेही सवलती, फायदे व सेवाशर्तीचा लाभ त्यांना अनुज्ञेय राहणार



Scanned with OKEN Scanner

नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती, शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

**ब) शहर स्तर-**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या अंमलबजावणीकरीता परिशिष्ट "अ" येथे नमूद शहरांमध्ये खालीलप्रमाणे प्रशासकिय यंत्रणा उपलब्ध केली जाईल:-

- **शहर अभियान व्यवस्थापन कक्ष**

शहर स्तरावर या अभियानाचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याकरीता "शहर अभियान व्यवस्थापन कक्ष" (City Mission Management Unit) स्थापन केले जाईल. महानगरपालिकांच्या स्तरावर महानगरपालिकेचे संबंधित आयुक्त व नगरपरिषद स्तरावर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या देखरेख व मार्गदर्शनाखाली "शहर अभियान कक्षाचे" कामकाज चालेल.

❖ **कार्यकारी समिती**

शहर स्तरावर अभियानाचे कामकाज पाहण्याकरीता आयुक्त / मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "कार्यकारी समिती" गठीत केली जाईल. सदरहू समितीवर केंद्र शासनाच्या धोरणानुसार राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियान (NRLM), उद्योग व बँकांचे प्रतिनिधी इत्यादी आवश्यक क्षेत्रातील प्रतिनिधींची सदस्य म्हणून नियुक्ती केली जाईल. कार्यकारी समिती गठीत करण्याबाबतचे विस्तृत आदेश केंद्र शासनाच्या सूचनेच्या अधीन राहून राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित करावे. अभियानाअंतर्गत केंद्राचे धोरण व सूचनेनुसार, शहर स्तरावर कंत्राटी तत्वावर ठोक मानधनावर "सहाय्यक प्रकल्प अधिकारी" तसेच "समुदाय संघटकांची" नियुक्ती केली जाईल. संबंधित शहराचे "शहर प्रकल्प अधिकारी" (City Project Officer) हे या शहर अभियान कक्षाचे प्रमुख म्हणून काम पाहतील. अभियानाअंतर्गत समावेश असलेल्या संबंधित मनपाच्या आयुक्तांनी अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता त्यांच्या अधिपत्याखालील, उपायुक्त दर्जाच्या योग्य अधिकाऱ्याची "शहर प्रकल्प अधिकारी" म्हणून नियुक्ती करणे आवश्यक राहील. सदरहू शहर प्रकल्प अधिकारी हे संबंधित मनपा आयुक्तांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार अभियानाचे दैनंदिन कामकाज सांभाळतील. अभियानाअंतर्गत समावेश असलेल्या नगरपरिषदांचे मुख्याधिकारी हे शहर अभियान कक्षाचे प्रमुख असतील व त्यांना या शासन निर्णयान्वये "शहर प्रकल्प अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

- **कंत्राटी तत्वावरील सेवा :-**

१) "शहरी अभियान व्यवस्थापन कक्षात, अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाच्या धोरण व मार्गदर्शक सूचनेनुसार खाली दर्शविल्यानुसार तांत्रिक तज्ञांच्या सेवा उपलब्ध केल्या जातील:-

| मोठी शहरे (५ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली) | मध्यम शहरे (३ लाख ते ५ लाखाच्या दरम्यान लोकसंख्या असलेली) | जिल्हा मुख्यालय (१ लाखापेक्षा कमी लोकसंख्या) व लहान शहरे (१ लाख ते ३ लाखाच्या दरम्यान लोकसंख्या असलेली) |
|---|---|---|
| १. सामाजिक विकास व संरचना व्यवस्थापक (Manager-Social Development and Infrastructure)<br>२. कौशल्य व उपजीविका व्यवस्थापक (Manager-Skills and Livelihoods)<br>३. वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय व्यवस्थापक (Manager-Financial Inclusion and Micro Enterprises)<br>४. माहिती संनियंत्रण प्रणाली व मुल्यांकन संनियंत्रण व्यवस्थापक (Manager-Monitoring information System and Evaluation) | १. सामाजिक विकास व संरचना व्यवस्थापक (Manager-Social Development and Infrastructure)<br>२. कौशल्य व उपजीविका व्यवस्थापक (Manager-Skills and Livelihoods)<br>३. वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय व्यवस्थापक (Manager-Financial Inclusion and Micro Enterprises) | १. सामाजिक विकास व संरचना व्यवस्थापक (Manager-Social Development and Infrastructure)<br>२. कौशल्य व उपजीविका व्यवस्थापक (Manager-Skills and Livelihoods) |



Scanned with OKEN Scanner

"शहर अभियान व्यवस्थापन कक्षातील" सदरहू तज्ञांची नियुक्ती "राज्यस्तरीय छाननी व निवड समिती" मार्फत, दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मांनधन कमाल रु. ४०,०००/- वर केली जाईल. सदर पदावर नियुक्त तज्ञ व्यक्ती आयुक्त/मुख्याधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. अभियानाअंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणानुसार, विहीत शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या आधारे तसेच कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून कंत्राटी तत्वावरील नियुक्ती कार्यपद्धतीबाबत राज्य अभियान संचालकांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत. कंत्राटी तत्वावर नियुक्त सर्व उमेदवारांची सेवा ही कंत्राटी तत्वावरच राहिल. शासकिय सेवकांना अनुज्ञेय असलेले कोणतेही सवलती/फायदे/सेवाशर्ती चा लाभ त्यांना अनुज्ञेय राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

**२) सहाय्यक प्रकल्प अधिकारी:**

"राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान" अंतर्गत केंद्र शासनाच्या धोरणानुसार "शहर प्रकल्प अधिकारी" यांच्या सहायतेकरिता प्रत्येक शहरात एक "सहायक प्रकल्प अधिकारी" यांची कंत्राटी तत्वावर प्रतिमाह ठोक मानधनावर नियुक्ती केली जाईल. त्या अनुषंगाने एकूण ५३ "सहायक प्रकल्प अधिकारी" यांची पदे खालीलप्रमाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

- संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने" अंतर्गत या ५३ शहरांमध्ये "प्रकल्प संचालक / प्रकल्प अधिकाऱ्याची " ठोक मासिक मानधनावर कंत्राटी तत्वावर निर्माण केलेली ४५ पदे "राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान" अंतर्गत "सहायक प्रकल्प अधिकारी" या पदात रुपांतरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सध्या या पदावर कार्यरत असलेले ४५ प्रकल्प संचालक / प्रकल्प अधिकारी या पदावरील नियुक्त व्यक्तींची "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत" केंद्राने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना व गुणवत्तेच्या आधारे "राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत" "सहायक प्रकल्प अधिकारी" म्हणून नव्याने कंत्राटी तत्वावर रु. ३०,०००/- मासिक मानधन तत्वावर पहिल्यांदा २ वर्षाकरिता नियुक्त करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.सदरहू नियुक्ती करण्यास संबंधित जिल्हाधिकारी सक्षम राहतील.



Scanned with OKEN Scanner

- ५३ प्रकल्प शहरातील ५३ सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या पदांपैकी उर्वरीत ०८ सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन रु. ३०,०००/- नुसार निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदरहू नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर व ठोक मानधन तत्वावर राहिल. संबंधित जिल्हाधिकारी यांनी या ८ पदांवर नियुक्ती करण्याची आवश्यक कार्यवाही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणानुसार करावी.
- अभियानाअंतर्गत नियुक्त केलेल्या शहर स्तरावरील सर्व संबंधित "सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या" कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील २ वर्षाकरीता त्यांना नियुक्ती द्यावी किंवा कसे याबाबत उचित निर्णय नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांच्या कामांच्या मूल्यमापनाच्या आधारे घ्यावा. सदरहू नियुक्तीच्या बाबतीत सर्व कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर केली जाईल. कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेच्या आधारे, व राज्य शासनाच्या आदेशाच्या आधारे नियुक्तीबाबत आवश्यक त्या सूचना "राज्य अभियान संचालक" यांनी निर्गमित कराव्यात. त्या आधारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावी. कंत्राटीतत्वावर नियुक्त सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांना, शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती / सोयी व सुविधा सवलती उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

### ३) समुदाय संघटक

- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या धोरणानुसार "सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या" सहायतेकरीता ५३ शहरांमध्ये प्रत्येकी ३००० कुटुंबांच्या मागे एक समुदाय संघटक असे एकूण ३६७ समुदाय संघटकांची कंत्राटी तत्वावरील पदे ठोक मानधन प्रतिमाह रु. १०,०००/- (दहा हजार) प्रमाणे निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.
- त्याअनुषंगाने अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरिता सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या सहाय्यतेकरीता प्रत्येक प्रकल्प शहरात ३ हजार दारिद्रय रेषेखालील कुंटुबाच्या प्रमाणात एका "समूदाय संघटकांची" (Community Organizer), कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन रूपये १०,०००/- नुसार नियुक्ती केली जाईल. सदरहू नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर राहिल. तदनंतर संबंधितांच्या कामाच्या मूल्यमापनाच्या आधारे कंत्राटाचे नूतनीकरण केले जाईल. केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेच्या आधारे, कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबतच्या मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश व राज्य शासनाच्या आदेशाच्या आधारे नियुक्तीबाबत आवश्यक त्या सूचना "राज्य अभियान संचालक" यांनी निर्गमित कराव्यात. त्या आधारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावी. कंत्राटीतत्वावर नियुक्त समुदाय संघटकांना शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती / सोयी व सुविधा सवलती उपलब्ध



Scanned with OKEN Scanner

राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

- सदरहू “समूदाय संघटक”, “सहाय्यक प्रकल्प अधिकारी” यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली काम करतील. अभियानाअंतर्गत स्वयंसहाय गट व त्यांचे संघ स्थापन करणे, समुदाय सहभाग, बँक संलग्नता (linkage) इत्यादींची जबाबदारी या “समुदाय संघटकाची” राहिल. प्रत्येक शहरात किमान १ समूदाय संघटक असणे आवश्यक राहिल.

संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक १०.०५.२००२ च्या शासन निर्णयान्वये “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने” अंतर्गत उपरोक्त ५३ शहरांकरिता २०१ “समूह संघटकांची” पदे ठोक मासिक मानधनावर कंत्राटी तत्वावर निर्माण करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत ५३ शहरांत कार्यरत असलेली “समूह संघटकांची” २०१ पदे “समुदाय संघटक” यामध्ये केंद्र शासनाच्या सूचनेनुसार कंत्राटी तत्वावर रु. १०,०००/- ठोक मानधन प्रति माहिना यानुसार रुपांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या ५३ प्रकल्प शहरांमध्ये “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने” अंतर्गत सध्या कार्यरत असलेले २०१ “समूह संघटक” केंद्र शासनाने विहीत केलेले “राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत” अर्हता व अनुभव पूर्ण करीत असल्यास, गुणवत्तेच्या आधारे त्यांना या अभियानातंर्गत “समुदाय संघटक” म्हणून कंत्राटी तत्वावर रूपये १०,०००/- प्रतिमाह मानधनावर नव्याने नियुक्ती देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

“सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने” अंतर्गत उपलब्ध २०१ “समूह संघटकांची” पदे समुदाय संघटकांमध्ये रुपांतरीत करुन उर्वरित १६६ अतिरिक्त समुदाय संघटकांची, कंत्राटी तत्वावर रु. १०,०००/- प्रतिमाह मानधनावर निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. या १६६ अतिरीक्त समूदाय संघटकांची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती संबंधित जिल्हाधिकारी यांनी केंद्र शासनाने विहीत केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या आधारे तसेच पारदर्शकतेने नियुक्ती प्रक्रिया अवलंबून, या संदर्भातील शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या अधीन राहून करावे. कंत्राटी तत्वावर नियुक्त सर्व समूदाय संघटकांची नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता राहिल. संबंधित समूदाय संघटकाच्या कंत्राटाचे नूतनीकरण करण्याकरीता त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील २ वर्षाकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांनी कंत्राट नूतनीकरणाबाबतचा निर्णय घ्यावा.

राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष व शहर अभियान व्यवस्थापक कक्ष यांच्या स्तरावरील तसेच अभियाना अंतर्गत नव्याने करावयाच्या सर्व नियुक्त्या पारदर्शकतेने, अभियाना अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या सूचना व विविध प्रसिद्धी माध्यमांद्वारे जाहिराती देऊन करण्याची जबाबदारी राज्य अभियान



Scanned with OKEN Scanner

संचालकांची व जिल्हाधिकारी यांची राहिल. याबाबतची आवश्यक कार्यवाही करताना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत मार्गदर्शक सूचना व धोरण राज्य, शासनाचे प्रचलित आदेश व कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या/उच्च न्यायालयाच्या विविध आदेशातील तरतूदींच्या अधीन राहून संबंधितांनी करावी.

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार अभियानाच्या एकूण खर्चाच्या १२ टक्के पेक्षा अधिक तरतूद "क्षमता बांधणी व प्रशिक्षण" या घटकाकरीता मंजूर केली जाणार नाही.

**३.३.३. उपांग क्रमांक - ०३**

**कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता** [Employment through Skill Training and Placement (EST & P)]

अभियानाअंतर्गत शहरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरीता आवश्यक ती उपायोजना सदरहू घटकामार्फत केली जाईल. त्या अनुषंगाने संबंधित लाभार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरीता बाजारातील कौशल्याच्या गरजेनुसार आवश्यक कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिले जाईल. कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देताना सदरहू प्रशिक्षण "राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षण पात्रता आराखडा" (National Vocational Educational Qualification framework) (NVEQF) च्या आधारे असणे आवश्यक राहिल. सर्व प्रशिक्षण मॉडयुल्स "उद्योग आधारीत" (Industry Based) असणे आवश्यक राहिल, जेणेकरून लाभार्थ्यांना रोजगाराच्या संधी सहजरित्या उपलब्ध होतील.

प्रत्येक यशस्वी लाभार्थ्यास कौशल्य प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबाबत आवश्यक ते पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहिल. सदरहू प्रमाणपत्रास बाजारात व संबंधित उद्योगांमध्ये स्वीकारार्हता (acceptability) असणे आवश्यक राहिल. प्रशिक्षण देणाऱ्या संबंधित संस्थेकडेच लाभार्थीची चाचणी व कौशल्य प्रमाणित करण्याची जबाबदारी देता येणार नाही. अश्या सर्व संस्थांची स्वतंत्र्यपणे निवड करून योग्य पॅनल तयार करण्याची जबाबदारी राज्य अभियान संचालकांची राहिल. केंद्रीय/राज्य शासनाच्या संस्था, निमशासकिय संस्थांनाही "प्रमाणिकरण संस्था" (Certification agency) म्हणून नियुक्त करता येईल. यासंदर्भात अभियानाअंतर्गत केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक कार्यवाही राज्य संचालक अभियान यांनी करावी.



Scanned with OKEN Scanner

अ) **कौशल्य प्रशिक्षण उपलब्धक** ( Skill Training Provider)

अभियानाच्या या घटकाअंतर्गत कौशल्य प्रशिक्षण उपलब्धकाचे स्वतंत्र पॅनल राज्य अभियान संचालकांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तयार करणे आवश्यक राहील. त्या करीता केंद्र शासन व राज्य शासनाने विहित केलेल्या संस्था, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये, निमशासकिय व खाजगी संस्था, तांत्रिक विद्यापीठांचा इत्यादींचा ही समावेश होऊ शकेल. सदरहू पॅनल चा कालावधी तीन वर्षांकरिता राहील. कौशल्य विकास प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षणार्थीची निवड केंद्र शासनाने विहित केलेल्या निकष व अटींच्या अधीन राहून करणे आवश्यक राहिल. शहरातील एकूण लोकसंख्येतील अ.जा./जमातीच्या टक्केवारीच्या प्रमाणात असलेल्यांना किमान अ.जा/जमातीच्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे आवश्यक राहिल. या घटकाअंतर्गत राज्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी कमीत कमी ३० टक्के लाभार्थी महिला, १५ टक्के लाभार्थी अल्पसंख्याक समाजातून व ३ टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातून असणे आवश्यक राहिल.

लाभार्थ्यांची निवड, समुपदेशन, प्रशिक्षण पूर्व तयारी, प्रशिक्षण साहित्य, प्रशिक्षक मानधन, प्रमाणपत्र, अवजार संच, प्लेसमेंट व इतर अनुषंगीक खर्च इत्यादी बाबींवर अभियानाअंतर्गत रू. १५,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी याप्रमाणे निधी उपलब्ध करण्यात येईल. उमेदवारांना बाजाराच्या आवश्यकतेनुसार संगणक प्रशिक्षण, इंग्रजी व स्थानिक भाषेमधील संभाषण कौशल्य, व्यवसायिक नितीमुल्ये, बचतीबाबत जागरूकता, बँकांशी संवाद, आर्थिक सुरक्षा इत्यादींवर भर कौशल्य विकास प्रशिक्षणा दरम्यान दिला जाईल. अभियानाच्या धोरणानुसार प्रशिक्षणाचा कालावधी कमीत कमी ३ महिने एवढा असणे आवश्यक राहील. त्यापैकी ४०० तास तांत्रिक प्रशिक्षणासाठी व ३० तास सॉफ्ट स्किल प्रशिक्षणाकरीता ठेवणे आवश्यक राहील. त्या अनुषंगाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा आराखडा इत्यादी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य अभियान संचालक यांनी आवश्यक कार्यवाही करावी. संबंधित प्रशिक्षण संस्थेला कमीत कमी ३ हप्त्यात (जसे ३०:५०:२०) या प्रमाणात प्रशिक्षणाकरीता निधी अदा करणे आवश्यक राहिल. त्या अनुषंगाने लाभार्थीचे प्रशिक्षण सुरू झाल्यावर, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व मान्यताप्राप्त संस्थेकडून प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यावर पहिले दोन हप्ते मंजूर केले जातील व शेवटचा हप्ता उमेदवाराला योग्य रोजगार उपलब्ध झाल्यानंतर व ६ महिने उमेदवाराच्या प्रगतीचा अनुचिन्हन (tracking) करुन दिला जाईल. याबाबत प्रशिक्षण कालावधी, त्यावरील खर्च आणि प्रशिक्षणार्थ्यांना रोजगाराचे निकष, प्रमाणीकरण, कौशल्य प्रशिक्षण संस्थांची निवड इत्यादी आवश्यक बाबींबाबत सविस्तर सूचना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणाच्या अधीन राहून राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.



Scanned with OKEN Scanner

नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सुजयो-२०१३/प्र.क्र.३००/नवि-३३, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१४ अन्वये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंतर्गत दारिद्र रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करुन कार्यक्रमाची अंमलबाजवणी करण्याकरीता शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्य स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी या राज्य शासनाच्या शिर्ष संस्थेची सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत कौशल्य प्रशिक्षण देणेसंदर्भात अग्रणी संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या शासन निर्णयाद्वारे “महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी” या संस्थेस राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंर्गत कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगाच्या अंमलबजावणीकरिता अग्रणी संस्था म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. या संदर्भातील आवश्यक विस्तृत सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात. तसेच सदर उपांगांच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक निधी राज्य अभियान संचालकांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीस वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावा. अभियानाच्या अंमलबजावणीकरिता उपलब्ध केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व वेळोवेळी, विहीत कालावधीत राज्य अभियान संचालकांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची राहिल. तसेच या उपांगाच्या अंमलबजावणीबाबतचा मासिक अहवाल महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी राज्य अभियान संचालकांनी विशद केलेल्या वेळापत्रकानुसार नियमितपणे सादर करावा.

**३.३.४. उपांग क्र. - ०४**

**स्वयंरोजगार कार्यक्रम** [Self Employment Programme (SEP)] :-

अभियानाअंतर्गत आवश्यक ते कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन बाजाराच्या गरजेनुसार शहरी गरीबांना त्यांच्या जीवनमानाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उद्योग व्यवसाय, लघु व्यवसायाच्या माध्यमातून स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी आवश्यक ते सहाय्य या घटकाद्वारे देण्यात येईल. त्या अनुषंगाने स्वयंरोजगार कार्यक्रमाअंतर्गत खालील नमूद बाबींवर भर देण्यात येईल:-

i) उमेदवारांची क्षमता, कौशल्य, आवड व कल इत्यादी लक्षात घेवून व्यवसायाची निवड करण्यासाठी मार्गदर्शनपर सहाय्य करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

ii) या घटकाअंतर्गत वैयक्तिकरीत्या किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज रूपाने भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल.

iii) या घटकाअंतर्गत शहरी गरिबांना वैयक्तीक व्यवसायासाठी रूपये २.०० लक्ष पर्यंत तर सामुहिकरीत्या व्यवसायासाठी रू. १०.०० लक्ष पर्यतचे कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

iv) या घटकाअंतर्गत लाभार्थ्यांने घेतलेल्या कर्जावर द.सा.द.शे ७ टक्के वरील व्याजदरासाठी अनुदान देण्यात येईल.

v) लाभार्थ्यांना बँकेकडून कर्ज मिळविण्यासाठी अनुषंगीक/सांपर्षीक (Collateral) हमी देण्याची गरज राहणार नाही, त्याने उभारलेला व्यवसाय त्यांच्या कर्जाची हमी म्हणून गृहीत धरले जाईल.

vi) वरीलप्रमाणे व्याजदरावरील अनुदान सर्व बचत गटांसाठी देखील अनुज्ञेय राहिल. तथापी महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची त्यांनी विहित कालावधीत परतफेड केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून व्याजदरातील रकमेत द.सा.द.शे. ३ टक्के अतिरीक्त अनुदान देण्यात येईल.

vii) लाभार्थ्यांना त्यांचा व्यवसाय सुरळीत चालविण्यासाठी बँकेकडून खेळते भांडवल व इतर गरजा भागविण्याच्या दृष्टीने बँकेकडील क्रेडिट कार्ड उपलब्ध केले जाईल.

viii) स्वयंरोजगार कार्यक्रमाअंतर्गत उपजिविका उपक्रमासाठी, मूलभूत सेवा तांत्रिक, विपणन व सल्ला सेवा उपलब्ध करून देण्यात येतील. वैयक्तीक व सामूहिक व्यवसायासाठी विपणन सहाय्याअंतर्गत बाजारपेठ संशोधन, लाभार्थ्याद्वारे तयार करण्यात आलेल्या मालाचे Branding वेष्टनीकरण (Packaging) इत्यादींची मदत करणे, सल्ला देणे मार्गदर्शन करणे तसेच बाजारासाठी तांत्रिक क्षमता सोयी उपलब्ध केल्या जातील.

स्वयंरोजगार घटकाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता केंद्र शासनाच्या धोरण व मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आवश्यक त्या सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

**३.३.५ उपांग क्र - ५**

**फेरीवाल्यांना सहाय्य** (Support to Urban Street Vendor)

अभियानाअंतर्गत प्रकल्प शहरातील फेरीवाल्यांचे बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करून त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाईल. त्या अनुषंगाने शहरी



Scanned with OKEN Scanner

फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहर फेरीवाला आराखडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करणे हे या उपांगाचे उद्दीष्ट राहिल. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाकरीता असलेल्या एकूण उपलब्ध तरतूदीच्या ५ टक्के एवढी रक्कम "फेरीवाल्यांना सहाय्य" या उपांगावर खर्च करणे आवश्यक राहिल. सदरहू उपांगाची अंमलबजावणी पुढील प्रमाणे केली जाईल.

१) विक्रीसाठी नागरी नियोजन (Pro-vending Urban Planning) शहरातील फेरीवाल्यांचे सामाजिक व आर्थिक (Socioeconomic) सर्वेक्षण करून त्याद्वारे फेरीवाल्यांचे नोंदणी करणे, ओळखपत्र देणे, डाटाबेस तयार करण्यावर भर दिला जाईल, जेणेकरून विक्रीसाठी नागरी नियोजन तसेच फेरीवाल्यांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करणे शक्य होईल.

२) कार्य कौशल्याचा विकास आणि फेरीवाल्यांसाठी लघुव्यवसाय सहाय्य (Skill Development and Micro Enterprise Development Support):

या अभियानाअंतर्गत असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगांतर्गत फेरीवाल्यांना कौशल्ययुक्त प्रशिक्षण दिले जाईल.

३) फेरीवाल्यांना पत मिळविण्यासाठी समर्थ करणे (Credit enablement of street Vendors):-

या उपांगांतर्गत फेरीवाल्यांना मूलभूत बँकिंक सेवा मिळविण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन दिले जाईल. तसेच खेळते भांडवल उपलब्ध करण्याच्या दृष्टीने संबंधितांना बँकेकडून क्रेडीट कार्ड उपलब्ध करण्याकरीता ही प्रयत्न केले जातील.

४) फेरीवाल्यांसाठी बाजारपेठांचा विकास (Development of Vendor Markets):-

या उपांगांतर्गत विक्री क्षेत्र, विक्री योजना व बाजारपेठा इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला जाईल.

५) सामाजिक सुरक्षेची एक केंद्राभिमुखता (Social Security Convergence):-

या उपांगाद्वारे, सदरहू फेरीवाल्यांना केंद्र/ राज्य शासनाकडील सामाजिक सुरक्षितता लाभ, व इतर योजनांचा लाभ घेण्याकरीता प्रोत्साहीत केले जाईल.



Scanned with OKEN Scanner

सदर उपांगाची अंमलबजावणीची जबाबदारी राज्य स्तरावर राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष व शहर स्तरावर संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची व त्या अनुषंगाने शहर अभियान व्यवस्थापन कक्षाची राहिल. राज्य शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक ०७ येथील दिनांक २९/१०/२०१३ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून तसेच या संदर्भात मा. सर्वोच्च न्यालयाने SLP क्र. ४१५६/२००२ व इतर मधील दिनांक ०९.०९.२०१३ व वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या उपांगाची अंमलबजावणी करणे आवश्यक राहिल. या अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना राज्य अभियान संचालकांनी निर्गमित कराव्यात.

**३.३.६. उपांग क्र.०६**

**शहरी बेघरांना निवारा** [Scheme of Shelter for Urban Homeless]

निवारा ही मानवाची मूलभूत गरज असल्याने अत्यंतीक गरीब व्यक्तीला या उपांगांतर्गत मूलभूत सुविधा असलेल्या कायमस्वरूपी निवाऱ्याची व्यवस्था या उपांगाद्वारे उपलब्ध केली जाईल. प्रत्येक १ लक्ष लोकसंख्येसाठी ५० ते १०० बेघर व्यक्तींना आश्रय देण्याकरीता एक निवारा उपलब्ध केला जाईल. सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे पहिल्या टप्प्यात ज्या शहरांची लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त आहे, त्या शहरांमध्ये हा उपांग राबविला जाईल.

या उपांगाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे:-

१) नागरी गरीब बेघरांना मूलभूत सोयी व सुविधा उदा. पाणी स्वच्छता, सुरक्षितता, लाईट इत्यादी उपलब्ध केलेले निवारे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध करणे.
२) नागरी गरीब बेघरांपैकी मुख्यत: लहान मुल, महिला, वयोवृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती, आजारी व्यक्तींना निवाऱ्याची सोय उपलब्ध करणे.
३) संबंधितांना, सामाजिक सुरक्षितता, निवृत्ती वेतन व शासनाच्या इतर योजनांचा लाभ ही त्या अनुषंगाने उपलब्ध करणे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्रमांक १९६/२००१ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून, तसेच या अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व संदर्भाधीन क्रमांक ६ येथील नगर विकास विभागाच्या दिनांक १४/७/२०११ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून याबाबतच्या सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात. केंद्र शासनाच्या क्रमांक D.O.No.K-१४०१२/२/२०१४-UPA व दि. ३/०६/२०१४ मधील सूचनेच्या अनुषंगाने प्रकल्प स्तरावर



Scanned with OKEN Scanner

निवारा उपलब्ध करण्याच्या अनुषंगाने प्रस्तावास मंजूरी देण्याकरीता “राज्य स्तरीय प्रकल्प मान्यता समिती” गठीत करण्याबाबत या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. या समितीबाबतचे विस्तृत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित केले जातील.

### ३.४ राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाची प्रशासकीय संरचना

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणाच्या अनुषंगाने राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता खालीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहे.

**अ) राज्य नियामक मंडळ:-**

मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली **“**राज्यस्तरीय नियामक मंडळ**”,** गठीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचे विस्तृत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**ब) राज्यस्तरीय कार्यकारी समिती:-**

राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली “राज्यस्तरीय कार्यकारी समिती” गठीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचे विस्तृत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**क) राज्य स्तरीय व्यवस्थापन समिती:-**

प्रधान सचिव नगर विकास -०२ यांच्या अध्यक्षतेखाली “व्यवस्थापन समिती” गठीत करण्यात येत आहे. याबाबतचे विस्तृत आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

### ३.५ राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत वित्तीय व्यवस्थापन-

१. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे सदर अभियानाअंतर्गत निधी केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान स्वरूपात ७५:२५ या प्रमाणात उपलब्ध केला जाईल.

२. राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाद्वारे संबंधित महानगरपालिका व नगरपरिषदांना अभियानाच्या अंमलबजावणीकरीता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

## ३.६ अभियानाअंतर्गत प्रशासकिय व इतर अनुषंगिक खर्च {Administration and Other Expenses (A&OE)}

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार अभियानाच्या प्रशासकिय व इतर अनुषंगिक खर्चाकरीता अभियानाच्या एकूण २ टक्के इतकी तरतूद उपलब्ध केली जाईल. त्यातून अभियान व्यवस्थापन, संनियंत्रण, डाटा बेस विकसन व व्यवस्थापन, मुल्यांकन व इतर उपक्रम, e-tracking इ. बाबींवर खर्च करणे आवश्यक राहिल. सदर निधी, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हास्तर व शहरी अभियान अंमलबजावणी कक्षाच्या स्तरावर किती प्रमाणात व कशा प्रकारे खर्च करावा याबाबतचा निर्णय राज्य अभियान संचालक घेण्यास सक्षम असतील व त्यांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

## ३.७ माहिती, शिक्षण व संवाद ( Information Education Communication )

अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता माहिती, शिक्षण व संवाद या घटकांवर मोठया प्रमाणात राज्य स्तरावरून तसेच शहरी क्षेत्रावरून प्रसिद्धी केली जाईल. त्या अनुषंगाने या घटकाकरीता अभियानाअंतर्गत एकूण उपलब्ध तरतूदीच्या ३ टक्के इतका निधी या घटकाच्या अंमलबजावणीवर खर्च करण्यास मुभा राहिल. याबाबतच्या विस्तृत सूचना राज्य अभियान संचालकाद्वारे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेच्या अधीन राहून वेळोवेळी देण्यात येतील. या घटकांतर्गत अभियानाच्या अनुषंगाने प्रसार, प्रचाराचे कार्य, माहिती पुस्तीका, प्रशिक्षण साहित्य निर्मिती, बचत गटांसाठी हस्तपुस्तिका, यशोगाथांचे सातत्याने प्रकाशन, नियतकालीकांचे प्रकाशन, संवाद साहित्य निर्मिती, माहिती पट निर्मिती व ऑडिओ जिंगल इत्यादींवर खर्च केला जाईल.

## ३.८ संनियंत्रण व माहिती प्रणाली (Monitoring and Information System)

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व आदेशानुसार अभियानाचे संनियंत्रण व समन्वयन करण्याची जबाबदारी राज्य स्तरावर राज्य अभियान संचालक यांची राहिल. जिल्हा स्तर व शहर स्तरावरून अभियानाचे संनियंत्रण व समन्वय करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व संबंधित महानगरपालिका आयुक्त/नगरपरिषद मुख्याधिकारी यांची राहिल. सर्व संबंधितांनी राज्य अभियान संचालकांनी निर्गमित केलेल्या सूचनेनुसार अभियानाचे संनियंत्रण व समन्वयन करावे. केंद्र शासनाद्वारे ठरवून दिलेल्या भौतिक उदिष्टांच्या आधारे अभियानाअंतर्गत समावेश असलेल्या संबंधित शहरांनी उद्दिष्टये पूर्ती करणे गरजेचे राहिल.



Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ती सर्व कार्यवाही सर्व संबंधितांनी त्या अनुषंगाने केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करणे बंधनकारक राहिल.

**०४. भाग-२**

## राज्य नागरी उपजिविका अभियान

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान राज्यातील फक्त ५३ शहरांमध्ये राबविली जाणार असल्यामुळे, राज्य शासन पुरस्कृत "राज्य नागरी उपजिविका अभियान" राज्यातील उर्वरीत २०६ शहरांमध्ये राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या धर्तीवर राबविण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

### ४.१ राज्य अभियानाचे उद्दिष्टे

१) नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींची क्षमता बांधणी.

२) नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींना उपजिविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे.

३) बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार विविध क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

४) नागरी गरिबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.

५) नागरी फेरीवाल्यांच्या उपजिविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

### ४.१ राज्य अभियानाची उपांगे

१. सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी. (Social Mobilization and Institutional Development.)

२. कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता. (Employment Through Skill training & Placement)



Scanned with OKEN Scanner

३. क्षमता बांधणी व प्रशिक्षण. (Capacity Building and Training)

४. स्वयंरोजगार कार्यक्रम. (Self Employment Programme)

५. फेरीवाल्यांना सहाय्य. (Support to Urban Street Vendors)

"राज्य नागरी उपजीविका अभियान" हे राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या धर्तीवर राबविले जाणार आहे. त्या अनुषंगाने वर विहीत केलेल्या उपांगांची अंमलबजावणी या २०६ शहरांमध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणानुसार केली जाईल.

४.२.१. उपांग-०१

**सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी**

या शासन निर्णयाच्या भाग-१ मध्ये "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत" विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे सदर उपांगाची अंमलबजावणी केली जाईल. त्या अनुषंगाने स्वयंसहाय्यता गट, वस्ती स्तर संघ, शहर स्तर संघ, शहरी उपजिविका केंद्र इत्यादींची स्थापना या शासन निर्णयातील भाग-१ मधील परिच्छेद क्र. ३.३.१ मधील विहित मानकानुसार केली जाईल. या उपांगाच्या अंमलबजावणीकरीता भाग -१ मधील मार्गदर्शक तत्वानुसार आवश्यक निधी राज्य नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत उपलब्ध केला जाईल. या उपांगाच्या अंमलबजावणीबाबतचे विस्तृत आदेश राज्य अभियान संचालकांनी निर्गमित करावेत.

४.२.२ उपांग ०२

**कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता**

राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत २०६ प्रकल्प शहरांमध्ये या उपांगाची अंमलबजावणी या शासन निर्णयाच्या भाग-०१ मधील परिच्छेद क्र. ३.३.३ मध्ये नमूद केल्यानुसार केली जाईल.

**अ) कौशल्य प्रशिक्षण उपलब्धक ( Skill Training Provider)**

अभियानाच्या या उपांगांतर्गत कौशल्य प्रशिक्षण उपलब्धकाचे स्वतंत्र पॅनल राज्य अभियान संचालकांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तयार करणे आवश्यक राहील. त्या करीता केंद्र शासन व राज्य शासनाने विहित केलेल्या संस्था, शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन,



Scanned with OKEN Scanner

अभियांत्रिकी महाविद्यालये, निमशासकिय व खाजगी संस्था, तांत्रिक विद्यापीठांचा इत्यादींचा ही समावेश होऊ शकेल. सदरहू पॅनल चा कालावधी तीन वर्षांकरिता राहील. कौशल्य विकास प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षणार्थीची निवड केंद्र शासनाने विहित केलेल्या निकष व अटींच्या अधीन राहून करणे आवश्यक राहिल. शहरातील एकूण लोकसंख्येतील अ.जा./जमातीच्या टक्केवारीच्या प्रमाणात असलेल्यांना किमान अ.जा/जमातीच्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे आवश्यक राहिल. या उपांगांतर्गत राज्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी कमीत कमी ३० टक्के लाभार्थी महिला, १५ टक्के लाभार्थी अल्पसंख्याक समाजातून व ३ टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातून असणे आवश्यक राहिल.

लाभार्थ्यांची निवड, समुपदेशन, प्रशिक्षण पूर्व तयारी, प्रशिक्षण साहित्य, प्रशिक्षक मानधन, प्रमाणपत्र, अवजार संच, प्लेसमेंट व इतर अनुषंगीक खर्च इत्यादी बाबींवर अभियानाअंतर्गत रू. १५,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी याप्रमाणे निधी उपलब्ध करण्यात येईल. उमेदवारांना बाजाराच्या आवश्यकतेनुसार संगणक प्रशिक्षण, इंग्रजी व स्थानिक भाषेमधील संभाषण कौशल्य, व्यवसायिक नितीमुल्ये, बचतीबाबत जागरूकता, बँकांशी संवाद, आर्थिक सुरक्षा इत्यादींवर भर कौशल्य विकास प्रशिक्षणा दरम्यान दिला जाईल. अभियानाच्या धोरणानुसार प्रशिक्षणाचा कालावधी कमीत कमी ३ महिने एवढा असणे आवश्यक राहील. त्यापैकी ४०० तास तांत्रिक प्रशिक्षणासाठी व ३० तास सॉफ्ट स्किल प्रशिक्षणाकरीता ठेवणे आवश्यक राहील. त्या अनुषंगाने प्रशिक्षण कार्यक्रमाचा आराखडा इत्यादी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य अभियान संचालक यांनी आवश्यक कार्यवाही करावी. संबंधित प्रशिक्षण संस्थेला कमीत कमी ३ हप्त्यात (जसे ३०:५०:२०) या प्रमाणात प्रशिक्षणाकरीता निधी अदा करणे आवश्यक राहिल. त्या अनुषंगाने लाभार्थीचे प्रशिक्षण सुरू झाल्यावर, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर व मान्यताप्राप्त संस्थेकडून प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यावर पहिले दोन हप्ते मंजूर केले जातील व शेवटचा हप्ता उमेदवाराला योग्य रोजगार उपलब्ध झाल्यानंतर व ६ महिने उमेदवाराच्या प्रगतीचा अनुचिन्हन (tracking) करुन दिला जाईल. याबाबत प्रशिक्षण कालावधी, त्यावरील खर्च आणि प्रशिक्षणार्थ्यांना रोजगाराचे निकष, प्रमाणीकरण, कौशल्य प्रशिक्षण संस्थांची निवड इत्यादी आवश्यक बाबींबाबत सविस्तर सूचना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व धोरणाच्या अधीन राहून राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

या शासन निर्णयाच्या भाग-१ मधील परिच्छेद क्र. ३.३.३ मध्ये नमूद केल्यानुसार "महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीस" राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगाकरीता "राज्यस्तरीय अग्रणी संस्था" म्हणून नियुक्त करण्यात येत



Scanned with OKEN Scanner

आहे. त्या अनुषंगाने या उपांगाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाकरीता असलेल्या मार्गदर्शक सूचनांन्वये केली जाईल. या संदर्भातील आवश्यक विस्तृत सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात. त्या अनुषंगाने सदर उपांगासाठीचा आवश्यक निधी, राज्य अभियान संचालकांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीस उपलब्ध करून द्यावा.

**४.२.३. उपांग-०३**

**क्षमता बांधणी व प्रशिक्षण**

या शासन निर्णयाच्या भाग-०१ मधील परिच्छेद क्र. ३.३.२ मध्ये नमूद केल्यानुसार विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेच्या अनुषंगाने या उपांगाची अंमलबजावणी केली जाईल. तथापि राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत उपलब्ध केलेले विविध क्षेत्रातील तज्ञांची तांत्रिक सेवा राज्य नागरी उपजिविका अभियान अंतर्गत उपलब्ध केली जाणार नाही.

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेच्या आधारे राज्य अभियान संचालक यांनी राज्य नागरी उपजीविका अभियान राबविण्याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

**<u>राज्यस्तर - प्रशासकीय संरचना :</u>**

- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत स्थापन केलेल्या नियामक मंडळ, कार्यकारी समिती व व्यवस्थापन समिती, राज्य नागरी उपजिविका अभियानाचे सुद्धा कामकाज पाहतील.
- आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या बरोबरच राज्य नागरी उपजिविका अभियानाचे ही “राज्य अभियान संचालक” म्हणून कामकाज पाहतील.
- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या संनियंत्रणाकरीता नगरपरिषद प्रशासन संचालनालयात स्थापीत “राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष” हे राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाअंतर्गत ५३ शहरांबरोबर या २०६ शहरांतील राज्य नागरी उपजिविका अभियानाचे कामकाज पाहतील. राज्य नागरी उपजिविका अभियानाकरीता, राज्य स्तरावर कोणताही अतिरीक्त कर्मचारीवृंद निर्माण केले जाणार नाहीत.



Scanned with OKEN Scanner

## शहर स्तरः- प्रशासकिय संरचना

### शहरी अभियान व्यवस्थापन कक्ष

या शासन निर्णयाच्या भाग-०१ मधील परिच्छेद क्र. ३.३.२ च्या “ब” येथे नमूद केल्यानुसार या २०६ शहरांमध्ये ही शहरी अभियान व्यवस्थापन कक्ष (CMMU) स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांना “शहर प्रकल्प अधिकारी” म्हणून संबोधण्यात येईल. शहर प्रकल्प अधिकाऱ्यांच्या सहाय्यतेकरीता व योजनेच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाप्रमाणे राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत प्रत्येक शहराकरीता १ सहायक प्रकल्प अधिकारी व लोकसंख्येवर आधारीत समुदाय संघटकांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन तत्वावर करण्यास मान्यता देण्यात येते आहे.

### सहायक प्रकल्प अधिकारीः-

“राज्य नागरी उपजीविका अभियानाच्या” अंमलबजावणीकरीता “शहर प्रकल्प अधिकारी” यांच्या सहायतेकरिता प्रत्येक शहरात एक “सहायक प्रकल्प अधिकारी” यांची कंत्राटी तत्वावर प्रतिमाह ठोक मानधन रूपये ३०,०००/- प्रमाणे नियुक्ती केली जाईल. त्या अनुषंगाने एकूण २०६ अभियान शहरात २०६ “सहायक प्रकल्प अधिकारी” यांची पदे खालीलप्रमाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

- संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार “सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने” अंतर्गत या २०६ शहरांमध्ये “प्रकल्प संचालक / प्रकल्प अधिकाऱ्याचे” एकूण १०० पदे ठोक मासिक मानधनावर कंत्राटी तत्वावर निर्माण केलेली आहेत. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेमधील प्रकल्प संचालक/प्रकल्प अधिकारी यांची उपलब्ध १०० पदे “राज्य नागरी उपजीविका अभियान” अंतर्गत “सहायक प्रकल्प अधिकारी” या पदात रुपांतरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.
- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सध्या या पदावर कार्यरत असलेले प्रकल्प संचालक / प्रकल्प अधिकारी यांची “राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या” मार्गदर्शक सूचना व गुणवत्तेच्या आधारे “राज्य नागरी उपजीविका अभियानांतर्गत” “सहायक प्रकल्प अधिकारी” म्हणून नव्याने प्रथम दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर रु. ३०,०००/- मासिक मानधन तत्वावर नियुक्त करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. यासंदर्भात नियुक्तीबाबतची प्रक्रिया करण्यास संबंधित जिल्हाधिकारी सक्षम राहतील.



Scanned with OKEN Scanner

- राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत उर्वरीत १०६ शहरांमध्ये १०६ सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन रु. ३०,०००/- नुसार निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व गुणवत्तेच्या आधारे योग्य उमेदवाराची नियुक्ती सदरहू पदांवर पारदर्शकतेने व विहित पद्धतीने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी करावी. सदरहू नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर ठोक मानधन तत्वावर राहिल.
- अभियानाअंतर्गत नियुक्त सर्व "सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या" कामकाजाचे मूल्यमापन करून त्या नंतरच्या पुढील २ वर्षाकरीता त्यांना नियुक्ती द्यावी किंवा कसे याबाबत उचित निर्णय नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांच्या कामांच्या मूल्यमापनाच्या आधारे गुणवत्तेवर घ्यावा. सदरहू नियुक्तीच्या बाबतीत सर्व कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर केली जाईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेच्या आधारे तसेच कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश, राज्य शासनाच्या आदेशाच्या आधारे नियुक्तीबाबत आवश्यक त्या सूचना "राज्य अभियान संचालक" यांनी निर्गमित कराव्यात. त्या आधारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावी. कंत्राटी तत्वावर नियुक्त सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांना, शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती / सोयी व सुविधा सवलती उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

**३) समुदाय संघटक**

- अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरिता सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्या सहाय्यतेकरीता प्रत्येक प्रकल्प शहरात ३ हजार दारिद्रय रेषेखालील कुंटुबाच्या प्रमाणात एका "समूदाय संघटकांची" (Community Organizer) असे एकूण २१५ समुदाय संघटकांची पदे कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन रूपये १०,०००/- नुसार निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदरहू पदावरील नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर राहिल. तदनंतर संबंधितांच्या कामाच्या मूल्यमापनाच्या आधारे कंत्राटाचे नूतनीकरण केले जाईल. केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेच्या आधारे, मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले आदेश व राज्य शासनाच्या आदेशाच्या आधारे नियुक्तीबाबत आवश्यक त्या सूचना "राज्य अभियान संचालक" यांनी निर्गमित कराव्यात. त्या आधारे संबंधित जिल्हाधिकारी यांनी संबंधितांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावी. कंत्राटीतत्वावर नियुक्त



Scanned with OKEN Scanner

समुदाय संघटकांना शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती / सोयी व सुविधा सवलती उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत, सदरहू कंत्राटी तत्वानुसार नियुक्त व्यक्ती शासकिय सेवेत समावेश होण्याबाबत मागणी करू शकणार नाहीत.

- सदरहू "समूह संघटक" संबंधित "सहाय्यक प्रकल्प अधिकारी" यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली काम करतील. अभियानाअंतर्गत स्वयंसहाय गट व त्यांचे संघ स्थापन करणे, समुदाय सहभाग, बँक संलग्नता (linkage) इत्यादींची जबाबदारी या "समुदाय संघटकाची" राहिल. प्रत्येक शहरात किमान १ समूदाय संघटक असणे आवश्यक राहिल.

राज्य नागरी उपजीविका अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या धोरणानुसार "सहायक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या" सहायतेकरीता २०६ शहरांमध्ये प्रत्येकी ३००० कुटुंबांच्या मागे एक समुदाय संघटक असे एकूण २१५ समुदाय संघटकांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर ठोक मासिक मानधन रु. १०,०००/- (दहा हजार) प्रमाणे करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

संदर्भाधीन क्रमांक ५ येथील दिनांक १०.०५.२००२ च्या शासन निर्णयान्वये "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने" अंतर्गत उपरोक्त २०६ शहरांकरिता १३५ "समूह संघटकांची" पदे ठोक प्रतिमाह मानधन कंत्राटी तत्वावर निर्माण करण्यात आले आहे. ही १३५ पदे राज्य नागरी उपजिविका अभियानामध्ये समुदाय संघटक या पदात रूपांतरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत नियुक्त समूह संघटक केंद्र शासनाने राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंगर्त विहीत अर्हता व अनुभव पूर्ण करीत असल्यास गुणवत्तेच्या आधारे त्यांना समुदाय संघटक म्हणून राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत कंत्राटी तत्वावर नव्याने दोन वर्षाकरीता नियुक्ती देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत १३५ शहरांत कार्यरत असलेली "समूह संघटकांची" १३५ पदे "समुदाय संघटकमध्ये" कंत्राटी तत्वावर रु. १०,०००/- ठोक मानधन प्रति माहिना यानुसार रुपांतर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत १३५ समूह संघटकांची पदे समूदाय संघटकांमध्ये रूपांतरीत करून उर्वरीत ८० अतिरीक्त समूदाय संघटकांची कंत्राटी तत्वावर रूपये १०,०००/- प्रतिमाह मानधनावर निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

या ८० अतिरीक्त समूदाय संघटकांची कंत्राटी तत्वावरील नियुक्ती संबंधित जिल्हाधिकारी यांनी केंद्र शासनाद्वारे विहीत शैक्षणिक अर्हता व गुणवत्तेच्या आधारे, कंत्राटी तत्वावरील नियुक्ती संदर्भातील शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या अधीन राहून पारदर्शकतेने करावी. कंत्राटी तत्वावर नियुक्त सर्व समूदाय संघटकांची नियुक्ती प्रथम दोन वर्षाकरीता राहिल. त्या पुढील कालावधीकरीता संबंधित समूदाय संघटकांच्या कंत्राटाचे नूतनीकरण करण्याकरीता त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन गुणवत्तेच्या आधारे करून पुढील दोन वर्षाकरीता संबंधित जिल्हाधिकारी यांनी कंत्राट नूतनीकरणाबाबतचा निर्णय घ्यावा.

याबाबतची आवश्यक कार्यवाही करताना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंर्गत मार्गदर्शक सूचना व धोरण राज्य शासनाचे प्रचलित आदेश व कंत्राटी तत्वावरील नियुक्तीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या/उच्च न्यायालयाच्या विविध आदेशातील तरतूदींच्या अधीन राहून करण्याची जबाबदारी राज्य अभियान संचालक व त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांची राहील. याबाबतच्या सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

**जिल्हास्तरीय संरचना:- जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत अभियान अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्षाचा अंतर्भाव नसल्यामुळे राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत या दोन्ही अभियानाचे जिल्हा स्तरावरील अंमलबजावणी, समन्वयन व सनियंत्रण, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याकरीता जिल्हास्तरावर “जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष” स्थापन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

- या विभागाच्या शासन निर्णय क्र. जीईएन१००५/४९१/प्र.क्र.१५२/०५/नवि-१४ दि. १०.१०.२०१३ अन्वये जिल्हा स्तरावर निर्माण केलेले जिल्हा प्रशासन अधिकारी हे त्यांच्या इतर नियमित कामकाजाबरोबरच जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान व राज्य नागरी उपजिविका अभियानाचे समन्वयन व संनियंत्रणाचे काम पाहतील.
- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान व राज्य नागरी उपजिविका अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता जिल्हा प्रशासन अधिकारी नगर विकास शाखा यांच्या मदतीकरीता प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात (बृहन्मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून ) जिल्हा स्तरावरील जिल्हा नागरी उपजिविका अभियान कक्षात, “जिल्हा संनियंत्रण अधिकाऱ्याचे” एकूण ३३ पदे कंत्राटी तत्वावर ठोक मानधन प्रति माह रूपये ४०,००० प्रमाणे निर्माण करण्यास



Scanned with OKEN Scanner

मान्यता देण्यात येत आहे. जिल्हा संनियंत्रण अधिकाऱ्याच्या पदावर नियुक्ती करीता समाजकार्य पदव्युत्तर पदवी (MSW) ही शैक्षाणिक अर्हता व सामाजिक विकास (Social Development) मधील ८ वर्षाचा अनुभव असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करता येईल. कंत्राटी तत्वावरील नियुक्ती बाबत राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या सूचना व माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये या बाबतची कार्यवाही राज्य अभियान संचालक यांनी पार पाडावी.

**४.२.४ उपांग ०४**

**स्वयंरोजगार कार्यक्रम**

अभियानांतर्गत आवश्यक ते कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन बाजाराच्या गरजेनुसार शहरी गरीबांना त्यांच्या जीवनमानाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उद्योग व्यवसाय, लघु व्यवसायाच्या माध्यमातून स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन या उपांगाद्वारे देण्यात येईल. त्या अनुषंगाने स्वयंरोजगार कार्यक्रमाअंतर्गत खालील नमूद बाबींवर भर देण्यात येईल:-

i) उमेदवारांची क्षमता, कौशल्य, आवड व कल इत्यादी लक्षात घेवून व्यवसायाची निवड करण्यासाठी मार्गदर्शनपर सहाय्य करण्यात येईल.

ii) या उपांगांतर्गत वैयक्तिकरीत्या किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज रूपाने भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल.

iii) या उपांगांतर्गत शहरी गरिबांना वैयक्तीक व्यवसायासाठी रूपये २.०० लक्ष पर्यंत तर सामुहिकरीत्या व्यवसायासाठी रू. १०.०० लक्ष पर्यंतचे कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

iv) या उपांगांतर्गत लाभार्थ्यांने घेतलेल्या कर्जावर द.सा.द.शे ७ टक्के वरील व्याजदरासाठी अनुदान देण्यात येईल.

v) लाभार्थ्यांना बँकेकडून कर्ज मिळविण्यासाठी अनुषंगीक/सांपर्षीक (Collateral) हमी देण्याची गरज राहणार नाही, त्याने उभारलेला व्यवसाय त्यांच्या कर्जाची हमी म्हणून गृहीत धरले जाईल.

vi) वरीलप्रमाणे व्याजदरावरील अनुदान सर्व बचत गटांसाठी देखील अनुज्ञेय राहिल. तथापी महिला बचत गटांनी घेतलेल्या कर्जाची त्यांनी विहित कालावधीत परतफेड केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून व्याजदरातील रकमेत द.सा.द.शे. ३ टक्के अतिरीक्त अनुदान देण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

राज्य नागरी उपजिविका अभियानातंर्गत स्वयंरोजगार उपांगाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीकरीता, केंद्र शासनाच्या धोरण व मार्गदर्शक सूचनेच्या आधारे, आवश्यक त्या सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

**४.२.५ उपांग-०५**

**<u>फेरीवाल्यांना सहाय्य</u>**

अभियानांतर्गत प्रकल्प शहरातील फेरीवाल्यांचे बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्यांचा विकास करून त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्यावर भर दिला जाईल. त्या अनुषंगाने शहरी फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहर फेरीवाला आराखडा विकसित करणे, फेरीवाला क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करणे हे या घटकाचे उद्दीष्ट राहिल. राज्याच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाकरीता असलेल्या एकूण उपलब्ध तरतूदीच्या ५ टक्के एवढी रक्कम "फेरीवाल्यांना सहाय्य" या उपांगावर खर्च करणे आवश्यक राहिल. सदरहू उपांगाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे केली जाईल.

१) विक्रीसाठी नागरी नियोजन :-

शहरातील फेरीवाल्यांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करून त्याद्वारे फेरीवाल्यांचे नोंदणी करणे, ओळखपत्र देणे, डाटाबेस तयार करण्यावर भर दिला जाईल, जेणेकरून विक्रीसाठी नागरी नियोजन तसेच फेरीवाल्यांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करणे शक्य होईल.

२) कार्य कौशल्याचा विकास व फेरीवाल्यांसाठी लघुव्यवसाय सहाय्य :

या अभियानाअंतर्गत असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगांतर्गत फेरीवाल्यांना कौशल्ययुक्त प्रशिक्षण दिले जाईल.

३) फेरीवाल्यांना पत मिळविण्यासाठी समर्थ करणे :-

या उपांगांतर्गत फेरीवाल्यांना मूलभूत बँकिंक सेवा मिळविण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन दिले जाईल. तसेच खेळते भांडवल उपलब्ध करण्याच्या दृष्टीने तसेच संबंधितांना बँकेकडून क्रेडीट कार्ड उपलब्ध करण्याकरीता ही प्रयत्न केले जातील.



Scanned with OKEN Scanner

४) फेरीवाल्यांसाठी बाजारपेठांचा विकास :-

या उपांगांतर्गत विक्री क्षेत्र, विक्री योजना, बाजारपेठा इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यावर भर दिला जाईल.

५) सामाजिक सुरक्षेची एक केंद्राभिमुखता :-

या उपांगाद्वारे, सदरहू फेरीवाल्यांना केंद्र/ राज्य शासनाकडील सामाजिक सुरक्षितता लाभ, व इतर योजनांचा लाभ घेण्याकरीता प्रोत्साहीत केले जाईल.

या उपांगाच्या अंमलबजावणीबाबतच्या विस्तृत सूचना राज्य अभियान संचालक यांनी निर्गमित कराव्यात.

०५. राज्य नागरी उपजिविका अभियानांतर्गत, माहिती शिक्षण संवाद (IEC) व संनियंत्रण व माहिती प्रणाली (MIS) बाबतची कार्यवाही या शासन निर्णयाच्या भाग-०१ मधील परिच्छेद क्र. ३.७ व ३.८ नुसार केली जाईल. याबाबतच्या विस्तृत सूचना राज्य अभियान संचालकांनी निर्गमित कराव्यात.

**०६. राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान व राज्य नागरी उपजिविका अभियानांतर्गत निधीची तरतूद करण्याबाबतची कार्यपध्दती:-**

राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या निधीचा हिस्सा उपलब्ध करण्याकरीता तसेच राज्य नागरी उपजिविका अभियानाच्या अंमलबजावणीकरीता राज्य शासनाच्या निधीचा हिस्सा उपलब्ध करण्याकरीता राज्य स्तरावर दरवर्षी खालील लेखाशिर्षाखाली आवश्यकता व उपलब्धतेनुसार तरतूद करण्यात येईल.

**१. नगर विकास विभाग- मागणी क्रमांक एफ-०३,**
मुख्यलेखाशीर्ष - २२३०, कामगार व सेवायोजन
(०२) सेवायोजन सेवा
१०१, सेवायोजन सेवा
(०३) नागरी सेवायोजन व उपजिविका कार्यक्रम
(०३) (०१) राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (योजनातंर्गत)
(केंद्र हिस्सा ७५%) (२२३० ६०४७) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)



Scanned with OKEN Scanner

**२. नगर विकास विभाग- मागणी क्रमांक एफ-०३,**

मुख्यलेखाशीर्ष - २२३०, कामगार व सेवायोजन

(०२) सेवायोजन सेवा

१०१, सेवायोजन सेवा

(०३) नागरी सेवायोजन व उपजिविका कार्यक्रम

(०३) (०२) राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (केंद्र पुरस्कृत योजना) (योजनातंर्गत) (राज्य हिस्सा २५%) (२२३० ६०५६)

०१, वेतन

०६, दूरध्वनी

११, देशांतर्गत प्रवास खर्च

१३,कार्यालयीन खर्च

३१,सहायक अनुदाने (वेतनेतर)

**३. नगर विकास विभाग- मागणी क्रमांक एफ-०३,**

मुख्यलेखाशीर्ष - २२३०, कामगार व सेवायोजन

(०२) सेवायोजन सेवा

१०१, सेवायोजन सेवा

(०३) नागरी सेवायोजन व उपजिविका कार्यक्रम

(०३) (०३) राज्य नागरी उपजिविका अभियान (योजनातंर्गत) (राज्य योजना) (२२३०६०६५)

०१, वेतन

०६, दूरध्वनी

११, देशांतर्गत प्रवास खर्च

१३,कार्यालयीन खर्च

१३, कार्यालयीन खर्च

३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)

०७. भारतीय संविधानाच्या ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार शहरी दारिद्रय निर्मूलन ही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची घटनात्मक जबाबदारी आहे. त्यामुळे अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीची जबाबदारी संपूर्णत: संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहिल.



Scanned with OKEN Scanner

०८. राज्य स्तरावर राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व राज्य नागरी उपजीविका अभियानांचे संनियंत्रण व समन्वयाची जबाबदारी राज्य अभियान संचालक या नात्याने आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांची राहिल. राज्य अभियान संचालक यांनी अभियानाच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा.

०९. सदरचा शासन निर्णय नियोजन विभाग आणि वित्त विभाग यांच्या अनुक्रमे आनौपचारीक संदर्भ क्रमांक अनौ.सं.१७४/१४४४, दिनांक ०८ मे, २०१४ व क्रमांक युओआर.३४३/व्यय-३, दिनांक ०४ जून, २०१४ अन्वये प्राप्त अभिप्रायांचा विचार करुन राज्य मंत्रीमंडळाने दि. १३/०८/२०१४ रोजी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९०५११३८३४६५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Seema Pradeep Dhamdhere

Digitally signed by Seema Pradeep Dhamdhere
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Seema Pradeep Dhamdhere
Date: 2014.09.05 16:47:45 +05'30'

**( सीमा ढमढेरे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री सर्व विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री सर्व विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

८. प्रधान सचिव, (नगरविकास-१), मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, (नगरविकास-२), मंत्रालय, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लि.
११. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१२. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास.
१३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय, मुंबई.
१४. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.
१५. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
१६. सर्व विभागीय आयुक्त.
१७. सर्व जिल्हाधिकारी.
१८. उप सचिव (अर्थसंकल्प), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
२०. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती
२१. निवडनस्ती (नवि-३३)



Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट “अ”

शासन निर्णय क्र. एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३

**नगर विकास विभाग, दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ चे परिशिष्ट “अ”**

**राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातील ५३ शहरे**

| अ.क्र. | शहरांची नावे |
|---|---|
| १ | मुंबई महानगरपालिका |
| २ | ठाणे महानगरपालिका |
| ३ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका |
| ४ | वसई-विरार महानगरपालिका |
| ५ | नवी मुंबई महानगरपालिका |
| ६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ७ | भिवंडी-निजामपुर महानगरपालिका |
| ८ | उल्हासनगर महानगरपालिका |
| ९ | अंबरनाथ नगरपरिषद |
| १० | बदलापुर नगरपरिषद |
| ११ | पनवेल नगरपरिषद |
| १२ | अलिबाग नगरपरिषद |
| १३ | रत्नागिरी नगरपरिषद |
| १४ | सावंतवाडी नगरपरिषद |
| १५ | नाशिक महानगरपालिका |
| १६ | मालेगाव महानगरपालिका |
| १७ | धुळे महानगरपालिका |
| १८ | नंदुरबार नगरपरिषद |
| १९ | जळगाव महानगरपालिका |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| २० | चाळीसगाव नगरपरिषद |
| २१ | भुसावळ नगरपरिषद |
| २२ | अहमदनगर महानगरपालिका |
| २३ | पुणे महानगरपालिका |
| २४ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका |
| २५ | सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका |
| २६ | सातारा नगरपरिषद |
| २७ | सोलापुर महानगरपालिका |
| २८ | बार्शी नगरपरिषद |
| २९ | पंढरपुर नगरपरिषद |
| ३० | कोल्हापुर महानगरपालिका |
| ३१ | इचलकरंजी नगरपरिषद |
| ३२ | औरंगाबाद महानगरपालिका |
| ३३ | बीड नगरपरिषद |
| ३४ | हिंगोली नगरपरिषद |
| ३५ | नांदेड वाघाळा महानगरपालिका |
| ३६ | परभणी महानगरपालिका |
| ३७ | जालना नगरपरिषद |
| ३८ | लातुर नगरपरिषद |
| ३९ | उद्‌गीर नगरपरिषद |
| ४० | उस्मानाबाद नगरपरिषद |
| ४१ | बुलढाणा नगरपरिषद |
| ४२ | अकोला महानगरपालिका |
| ४३ | अमरावती महानगरपालिका |
| ४४ | अचलपूर नगरपरिषद |
| ४५ | वाशिम नगरपरिषद |
| ४६ | यवतमाळ नगरपरिषद |
| ४७ | वर्धा नगरपरिषद |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ४८ | हिंगणघाट नगरपरिषद |
| ४९ | भंडारा नगरपरिषद |
| ५० | नागपूर महानगरपालिका |
| ५१ | गोंदिया नगरपरिषद |
| ५२ | चंद्रपूर महानगरपालिका |
| ५३ | गडचिरोली नगरपरिषद |



Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ट "ब"

शासन निर्णय क्र. एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३

**नगर विकास विभाग, दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ चे परिशिष्ट "ब"**

**राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष**

**राज्य अभियान संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय (आयुक्त तथा संचालक)**

⇩

**उपसंचालक**

**(वेतनश्रेणी- १५६००-३९१००-ग्रेड पे-५४००)**

⇩

| | |
|---|---|
| ➢ सहायक संचालक-१ पद<br>(वेतन श्रेणी-९३००-३४८००-ग्रेड पे-४४००) | तांत्रिक विशेषज्ञ |
| ➢ लेखा अधिकारी - १ पद<br>(वेतन श्रेणी-९३००-३४८००-ग्रेड पे-४६००)<br>➢ लघुलेखक - १ पद<br>(वेतनश्रेणी-९३००-३४८००-ग्रेड पे-४३००)<br>➢ अधिक्षक - २ पदे<br>(वेतनश्रेणी-९३००-३४८००-ग्रेड पे-४३००)<br>➢ सांख्यिकी सहाय्यक - १ पद<br>(वेतनश्रेणी-५२००-२०२००-ग्रेड पे-२८००)<br>➢ लिपिक-टंकलेखक - २ पदे<br>(वेतनश्रेणी-५२००-२०२००-ग्रेड पे-१९००)<br>➢ शिपाई- - १ पद<br>(वेतनश्रेणी-४४४०-७४४०-ग्रेड पे-१३००) | १. सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी<br>२. निवारा व सामाजिक संरचना<br>३. कौशल्य व उपजिविका<br>४. वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय<br>५. मानव संसाधन व क्षमता बांधणी<br>६. माहिती संनियंत्रण प्रणाली, मूल्यांकन व संनियंत्रण |



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner